# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक १८/०६/२०२३ (रविवार)

..................................................................................

## जिवाने मारून टाकण्याची धमकी देवुन लुटणारा आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पोलीस स्टेशन भिवापुर :— अंतर्गत सेलोटी ता. भिवापुर येथे दि १६.६.२३ चे १८.०० वा दरम्यान, यातील फिर्यादी व त्याचे काका हे किराना व भाजीपाला घेण्याकरिता भिवापुर येथे आले व आपले किरकोळ कामे आटोपुन वेळ १८/०० वा. दर. फिर्यादी व त्याचे काका हे तहसिल कार्यालयाचे मागे नक्षी रोडवरील प्रेमनगर, भिवापुर येथे चिकन घेण्यास थांबले असता, फिर्यादीस बाथरूम लागल्याने ते बाथरूम करण्याकरिता रोडचे पलीकडे गेले असता, एक अनोळखी सरदार हा तिथे आला व फिर्यादी याचे गळ्यातील दुपट्टा आट मारून पकडुन एका झोपडीत नेले व आपले जवळील चाकु दाखवुन फिर्यादीचे पॅन्टचे मागील खिशातुन नगदी १०,०००/— रूपये काढले. व कुणाला सांगितले तर जिवाने मारून टाकीन? अशी धमकी दिली. तेव्हा एक बाई तिथे आली, त्यावेळी फिर्यादीने सरदारला विनंती केली की, मला घरी जाणेकरिता ५००/— रूपये दे तेव्हा एका बाईच्या सांगितल्यावरून सरदारने फिर्यादीला ५००/— रू काढुन परत दिले. आरोपीने ५००/— रूपये फिर्यादीला परत केल्यानंतर फिर्यादी तिथुन पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— शेषराव गुलाब चौधरी वय ४२ वर्ष रा सेलोटी ता भिवापुर मो.क्र. ९५२७०३४०६८ चे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपी नामे— (१) विजया सदाशिव धनविजय वय ४६ वर्ष रा. धर्मापुर, भिवापुर (२) एक अनोळखी सरदार पुरूष यांचेविरूध्द कलम ३९२,३४ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि प्रकाश चनगोले मो.क्र. ७९७२४४१८४६ हे करीत आहे.

पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे
मो क्र ९४२२६१४६३३
पोलीस माहीती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर